दि. 01/01/2026

**प्रेसनोट**

# अवैध व्यवसाय विरोधी अभियान

## (123) अवैध व्यवसायिक हद्दपार, तर (6) जण MPDA अंतर्गत स्थानबद्ध

## नांदेड परिक्षेत्रात वर्षभरात 15,000 कारवाया, 109 कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त

नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांचे उच्चाटन करण्यासाठी नांदेड, परभणी, लातूर व हिंगोली अशा चारही जिल्ह्यांत, गेल्या महाराष्ट्र दिनापासून म्हणजे 1 मे 2025 पासून अवैध व्यवसाय विरोधी अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.

उपरोक्त अभियानासह मागील वर्षभरात, परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत अवैध दारू, मटका, जुगार, लॉटरी, गुटखा, अंमली पदार्थ, वेश्याव्यवसाय, अवैध वाळू वाहतूक इत्यादी अवैध व्यवसायांविरुद्ध राबविलेल्या मोहिमेत खालील प्रमाणे कामगिरी केली आहे.

| अ.क्र. | जिल्हा | एकूण केसेस | जप्त मुद्येमाल | आरोपी संख्या |
|---|---|---|---|---|
| 1. | नांदेड | 4320 | 53,68,65,843 | 5353 |
| 2. | परभणी | 3744 | 19,22,83,346 | 4126 |
| 3. | लातूर | 4166 | 17,88,52,519 | 4654 |
| 4. | हिंगोली | 3610 | 18,92,43,455 | 3650 |
| **एकूण** | | **15,840** | **109,72,45,163** | **17,783** |

### नांदेड जिल्ह्यात गांजा तर लातूर जिल्ह्यात एम.डी. ड्रग्सचा साठा जप्त:

उपरोक्त कारवाईत, नांदेड पोलिसांनी लोहा पोलीस ठाण्याचे हद्दीत पकडलेला (14) लक्ष रुपयांचा गांजा, तर लातूर जिल्ह्यातील विवेकानंद पोलीस ठाण्याचे हद्दीत पकडण्यात आलेल्या (8) लक्ष रुपयांच्या एम.डी. ड्रग्सचा समावेश आहे.

### (123) अवैध व्यावसायिक हद्दपार तर 6 जण एम पी डी ए अन्वये स्थानबद्ध:

मागील वर्षभरात, नांदेड परिक्षेत्रात, अवैध व्यवसायांत गुंतलेल्या (123) इसमांना नांदेड, परभणी, लातूर व हिंगोली पोलीसांनी हद्दपार केले असून, नांदेड पोलीसांनी हातभट्टी दारू, गांजाविक्री, वाळू तस्कर व अवैध जुगार व्यवसायाशी निगडित 06 इसमांना (MPDA) कायदयाखाली एक वर्षासाठी स्थानबद्ध केले असून, त्यांची रवानगी छत्रपती संभाजीनगर कारागृहात करण्यात आली आहे.

### अवैध व्यवसायांची माहिती देण्यासाठी हेल्पलाईन 'खबर':

परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांची माहिती पोलीसांना देता यावी म्हणून, ' **खबर** ' ही हेल्पलाईन सुरु करण्यात आली असून नागरिकांना आता **91 50 100 100** या क्रमांकावर संपर्क करुन आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती कॉल करुन अथवा व्हाट्सअपचे माध्यमातून पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयात कळविता येणार आहे. अवैध व्यवसायांबाबत माहिती देणा-याचे नाव गोपनिय राखले जाईल, असे पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी स्पष्ट केले आहे.

### अवैध व्यवसायांच्या निर्मूलनासाठी परीक्षेत्रीय पातळीवर विशेष पथक:

परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांच्या निर्मूलनासाठी नुकतेच एक विशेष पथक गठीत करण्यात आले असून, या पथकाने परभणी जिल्ह्यातील कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत (13) लक्ष रुपयांचा तर, लातूर जिल्ह्यातील निलंगा पोलीस ठाण्याच्या हद्दीत (8) लक्ष रुपयांचा गुटखा पकडून आपल्या कारवाईस प्रारंभ केला आहे.

आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, नागरिकांनी नजीकच्या पोलिस ठाण्यास अथवा पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाच्या **nandedrange.mahapolice.gov.in** या संकेतस्थळावर किंवा 91 50 100 100 या हेल्पलाइनवर कळवून अशा अवैध व्यवसायांचा बिमोड करण्यासाठी आपला हातभार लावावा, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी केले आहे.

कार्यालय, पोलीस उप महानिरीक्षक,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड